दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ८३ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१६ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# तर महाराष्ट्रात कधीच कायदा-सुव्यवस्था राहणार नाही ;देवेंद्र फडणवीसांचं सर्वपक्षीयांना आवाहन

## ज्यांनी चूक केली आहे, त्यांना अजिबात माफी देण्याचा प्रयत्न करू नये

**नागपूर-राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने सध्या राज्यातील वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. सत्ताधारी व विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवर आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण रंगताना दिसत आहे. त्यातच दुसरीकडे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी दिलेली २४ डिसेंबरची मुदत जवळ येत असल्यामुळे त्यानंतर नेमकं काय होणार? याबाबत चर्चा सुरू झाली आहे. मराठा गेल्या महिन्यात मराठा आरक्षणाची मागणी करत काही जमावांनी राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या घरी जाळपोळ केल्याचे प्रकार घडले होते. यासंदर्भात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत निवेदन केलं.राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संदीप क्षीरसागर यांचं घर जमावाने जाळलं. बीड व माजलगावमध्ये राजकीय नेत्यांच्या घरांवर व कार्यालयांवर असे हल्ले झाल्यानंतर त्यावरून तीव्र राजकीय प्रतिक्रिया उमटल्या. हा मुद्दा आज विधानसभेत उपस्थित करत संदीप क्षीरसागर यांनी एसआयटी स्थापन करून चौकशी केली जाणार का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर बोलताना एसआयटी स्थापन करून चौकशी केली जाईल, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.**

पृथ्वीराज चव्हाणांचे फडणवीसांवर दोन गंभीर आरोप,२०१८ चं मराठा आरक्षण ही निव्वळ फसवणूक आणि..खरंतर ही घटना अतिशय गंभीर आहे. अशा प्रकारे जमावाने लोकप्रतिनिधींची घरं जाळणं, त्यांना लक्ष्य करणं हे गंभीर आहे. सर्वच पक्षाच्या लोकांना या जमावाने लक्ष्य केलं. सगळ्यांवरच हल्ला झाला. संदीप क्षीरसागर यांनी मांडलेले मुद्दे गंभीर आहेत. माझं असं स्पष्ट मत आहे की अशा घटनांकडे राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहिलं पाहिजे. अशा घटनांमध्ये आपण राजकारण करायला लागलो, तर महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था कधीही राहणार नाही, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.आधी घटना घडली तेव्हा पोलीस बळानं लगेच कारवाई केली. जर ती केली नसती, तर घटना याहीपेक्षा गंभीर झाली होती. पण जेवढे लोक एकत्र झाले होते, त्याप्रमाणात पोलिसांची ताकद कमी होती. बाहेरून पाठवलेले पोलीस पोहोचेपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी या घटना घडल्या होत्या, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी यावेळी विधानसभेत दिली.या सर्व प्रकरणात आत्तापर्यंत २७८ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी सभागृहाला दिली. एकच जमाव सगळीकडे गेला असं नाहीये. वेगवेगळे जमाव तयार झाले होते. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे लोक मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत आहेत. माजलगाव व बीडमध्ये आपण २७८ आरोपींना अटक केली आहे. त्यातले ३० आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या मोठ्या



गुन्ह्यांची नोंद आहे, असं फडणवीस म्हणाले.माजलगावच्या प्रकरणात अजूनही ४० गुन्हेगार फरार आहेत. बीडमधील वेगवेगळ्या गुन्ह्यांमधील ६१ गुन्हेगार अद्याप सापडलेले नाहीत. त्यांचा शोध चालू आहे. जमावातल्या सर्वच लोकांना पकडलेलं नसून ज्यांच्याविरूद्ध सबळ पुरावा आहे, जे लोक हे सगळं करताना दिसत आहेत त्यांच्यावर कारवाई केली आहे. मोबाईल लोकेशन, मोबाईलमधले मेसेजेस, अशा सर्वच मार्गांनी ज्यांच्याविरुद्ध पुरावे मिळाले आहेत, अशांना अटक केली आहे, असंही फडणवीसांनी सांगितलं.दरम्यान, बीड व माजलगावमध्ये अधिक कठोर पोलीस कारवाई व्हायला हवी होती, असं फडणवीसांनी विधानसभेत मान्य केलं आहे. पोलिसांची कारवाई याहीपेक्षा जास्त व्हायला हवी होती. पण दंगलखोर जमाव व पोलिसांची संख्या यात मोठी तफावत होती. पोलिसांची नवी कुमक पोहोचेपर्यंत या घटना नियंत्रणात आणणं कठीण झालं हेही सत्य आहे, असं फडणवीस म्हणाले.दरम्यान, या सगळ्या घडामोडींमध्ये आरोपी म्हणून काही अशा लोकांना अटक करण्यात आली आहे ज्यांचा गुन्हेगारी जगताशी काहीही संबंध नाही, त्यांची सुटका करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली. ही मागणी फडणवीसांनी फेटाळून लावली. ज्यांनी चूक केली नसेल, त्यांना अटकेतून बाहेर काढेन हा शब्द मी देतो. पण ज्यांनी चूक केली आहे, त्यांना अजिबात माफी देण्याचा प्रयत्न करू नये. अशा प्रकारे जर आपण त्यांना आत्ता माफी द्यायला लागलो, तर भविष्यात महाराष्ट्रात एकाही लोकप्रतिनिधीचं घर शिल्लक राहणार नाही, अशा शब्दांत फडणवीसांनी क्षीरसागर यांना उत्तर दिलं.

# कोसरसार येथील असंख्य युवकांचा शिवसेनेत प्रवेश

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात बांधले शिवबंधन



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोसरसार येथील असंख्य युवकांनी शिवसेना (उबाठा) जिल्हा कार्यालयात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात व शहर प्रमुख संदीप मेश्राम यांच्या सहकार्याने शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन शिवसेना (उबाठा ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या वतीने वरोरा - भद्रावती विधानसभा क्षेत्रात ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या पक्षीय धोरणांवर अनेक सामाजिक कामाचा झंझावात सुरु आहे. त्यामुळे शिवसेना ( उबाठा ) गटाच्या कार्याला प्रेरित होऊन अनेक युवक शिवसेनेत प्रवेश घेत आहे. रविवारी शिवसेना जिल्हा कार्यालयात तालुक्यातील कोसरसार येथील असंख्य युवकांनी जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वावर विस्वास ठेऊन शिवसेनेत प्रवेश घेतला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख यांनी पक्षाच्या धेय्य धोरणाविषयी माहिती सांगून सर्वांना शिवबंधन बांधले. यावेळी शहर प्रमुख संदीप मेश्राम, युवासेना समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर, विधानसभा सोशल मीडिया प्रमुख गणेश चिडे, राजुपाटील गावंडे व आदी उपस्तिथ होते.

# अवैध रेती उत्खननावर पोलिसांची धाड;३८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय गुंजखेडा घाटावर अवैधरित्या रेतीचा उपसा सुरु असल्याची माहिती मिळताच पुलगाव पोलिसांनी कारवाई करत ३८ लाखाचा मुद्देमाल जप्त केला.

दि.१४ डिसेंबर ला रात्री ११ च्या सुमारास गुंजखेडा घाटावर संगणमताने रेती उपसा सुरु असल्याची माहिती पुलगाव पोलिसांना प्राप्त झाली. पोलिसांनी तातडीने कारवाई करीत जाफर हुसेन शहा (वय ३०वर्षे) राहणार गुंजखेडा, रोशन चंदेल कैथेल (वय ४० वर्षे )राहणार गुंजखेडा,शाम बालाराम ठाकरे (वय २९ वर्षे ), राहणार गुंजखेडा, ललित हेमंतराव इंगळे (वय ४१ वर्षे ), राहणार गुंजखेडा, अमोल राजेंद्रराव कंगाले (वय ३२ वर्षे )राहणार गुंजखेडा, कृष्णा सुरेश येटरे (वय ३४ वर्षे )राहणार गुंजखेडा, अजय ज्ञानेश्वर कात्रे (वय ३६ वर्षे )राहणार गुंजखेडा, पंकज कात्रे राहणार गुंजखेडा, भारत वामनराव तलमले (वय ३६ वर्षे )राहणार पुलगाव या आरोपीना ताब्यात घेऊन त्यांचेकडून १) एक जुना वापरता टॅक्टर क्र. एम. एच.३२-



ए -८९०९ किंमत रु.६०००००/-व जुनी वापरती ट्रॉली क्र. एम.एच.३२- ८५८७ किंमत अंदाजे रु.१५००००/- व या ट्रॉलीमध्ये भरून असलेली शंभर फूट रेती ( एक ब्रास ) किंमत अंदाजे पाच हजार रुपये,(२) एक जुना वापरता ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३२ -ए ७४१ अंदाजे किंमत सहा लाख रुपये, एक जुनी वापरते ट्रॉली क्रमांक एम एच ३२ ५५४८ ज्याची किंमत अंदाज आहे दीड लाख रुपये व या ट्रॉलीमध्ये भरून असलेली रेती १००फूट (१ ब्रास ) किंमत पाच हजार रुपये, (३) एक जुना वापरता ट्रॅक्टर क्रमांक एम एच २९ व्ही ३२६३ ज्याचे अंदाजे किंमत सहा लाख रुपये व एक जुनी ट्रॉली क्रमांक एम. एच.३२ पी १५८४ ज्याचे अंदाजे किंमत रु.१५००००/- व सदर ट्रॉली मध्ये असलेली शंभर फूट रेती (१ ब्रॉस )अंदाजे किंमत रु.५०००/-(४) एक जुना वापरता ट्रॅक्टर एम एच ३२ - ए ६१५९ सहा लाख, एक जुनी वापरते ट्रॉली क्रमांक एम एच ३२ ३ ४२८४ एक लाख ५० हजार रुपये वसुधर ट्रॉलीमध्ये भरून असलेली शंभर फुट रेती,अंदाजे किंमत पाच हजार रुपये,(५) क्रमांक एम एच ३२ ए ९२१८ अंदाजे किंमत सहा लाख रुपये व एक जुनी ट्रॉली पी ७१६ अंदाजे किंमत एक लाख ५० हजार रुपये असा एकूण मुद्देमाल ३७ लाख ७० हजार रुपये पोलिसांनी जप्त केला. सदर कारवाई पोलीस निरीक्षक दारासिंग राजपूत, पोलीस उपनिरीक्षक उमाकांत राठोड यांच्या मार्गदर्शनात चंद्रशेखर चुटे, सुधिर लडके, अमोल जिंदे, रवि रामटेके, विनोद रघाटाटे, रविंद्र जुगनाके, उमेश बेले, ओमप्रकाश तल्लारी यांनी कारवाई केली.

# पोंभुर्णावासियांनी अनुभवला खाकीतील देव

## चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील घटना

**मूल । प्रतिनिधी**

पोभुर्णा तालुक्यातील आदिवासी बांधवांचे विविध मागण्यांना घेऊन पोभुर्णा पोलीस स्टेशनसमोर दोन दिवसापासून ठिय्या आंदोलन सुरु होते. तिसऱ्या दिवशी दुपारी पोलिसांनी आंदोलन हाणून पाडत ३० लोकांना ताब्यात घेतले.पुढील कार्यवाही करिता त्यांना मूल येथील न्यायालयात हजर करण्यात आले.यातील २६ जणांची जमानत झाली. मात्र उशिरापर्यंत न्यायालयीन प्रक्रिया सुरु असल्याने रात्रीचे १० वाजले होते.त्यामुळे मूल पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुमित परतेकी यांनी सामाजिक दायित्व तथा मानव सेवा म्हणून २६ जणांना पोलीस ठाण्यात भोजनाची व त्यांच्या गावी परत सोडून देण्याची व्यवस्था केली.

जण सामान्यांच्या मते पोलीस म्हणजे कायद्याचे कठोर पालन करणारा वर्दीतील माणूस,अशीच ओळख आहे.मात्र,हे खरे नाही. कायदा व सुव्यवस्था यांच्या नियमांसाठी खाकीतील माणूस कठोर असला तरी जिथे माणुसकीची गरज पडते, तिथे तो हळव्या मनाचा, प्रेमळ हृदयाचा संवेदनशील असतो. याची प्रचिती अनेक वेळा आली आहे. रात्री मूल पोलीस स्टेशनमध्ये याचा पुन्हा प्रत्यय आला.पोभुर्णा पोलीस स्टेशनसमोर






असलेल्या ठिय्या आंदोलनातील १९ महिला व ७पुरुष, असे २६ लोकांना मूल न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयीन प्रक्रियेला रात्रीचे १० वाजले होते.या सर्व महिला व पुरुषांना आपापल्या गावी परत जाण्याकरिता उशीर झाल्याने साधन उपलब्ध नसल्याने अडचण निर्माण झाली होती.त्यांची अडचण ठाणेदार परतेकी यांनी चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांना सांगितली,त्यांनी ठाणेदार सुमित परतेकी यांना २६लोकांना जेवणाची सोय व गावी सोडून देण्याची सूचना केली.रात्रीची वेळ व २६ लोक उपाशी असल्याची जाणीव ठेवत उपविभागीय पोलीस अधिकारी मल्लीकार्जून इंगळे,मूल पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुमित परतेकी व पोलीस कर्मचाऱ्यांनी रात्री १० वाजेदरम्यान मूल पोलीस ठाण्यात भोजनाची व्यवस्था केली व त्या २६ लोकांना आपापल्या गावी सोडून दिले.या कृतिमुळे 'मानवसेवा हिच ईश्वर सेवा' हा परिपाठ खाकीतल्या माणसानी शिकवीला असून त्याचा बोध इतरांनीही घेण्यासारखा आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांचे स्नेह मिलन संपन्न



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील पुलगाव नाचणगाव परिसरातील जिल्हा परिषद,नगरपालिका तसेच खाजगी शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांचा मनोमिलन सोहळा नुकताच पार पडला. यावेळी मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ शिक्षक श्रीवास्तव तर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक दारासिंग राजपूत,माजी प्राचार्य नुरसिंग जाधव होते.आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवल्यास तसेच कोणाकडून काही अपेक्षा न केल्यास आपले आयुष्य आनंदी व सुखमय जाते, असे प्रतिपादन ठाणेदार राजपूत यांनी केले. अशा कार्यक्रमाची समाजाला गरज असून या कार्यक्रमातून आयुष्य जगण्याची ऊर्जा मिळते. तसेच अशा या कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी व्हावे, ही इच्छा जाधव यांनी व्यक्त केली. यावेळी १५ ज्येष्ठ शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू थुल व राजेंद्र वांदिले यांनी सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेलरांधे यांनी केले. यावेळी विठ्ठल वानखडे, छाया बिरे,नलिनी ढोबळे,गुल्हाने, बोदिले, उके,सोनुरकर, ढेकले उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन सौ कल्पना बिरे यांनी केले.

## संपादकीय

# स्थित्यंतरातील वाहने नि आव्हाने



हळूहळू पण निश्चितपणे जग बॅटरीवर चालणारी वाहने वापरू लागले आहे. जगभरात सर्व वाहनकंपन्या आपापले पेट्रोल- डिझेल इंजिनकडून विजेवर चालणाऱ्या इंजिनचे नियोजन जाहीर करत आहेत. भारतही या बदलामध्ये मागे नाही. सर्व मोठ्या भारतीय कंपन्या आपल्या विजेवरील चारचाक्या आणि दुचाकी वाहने उत्पादन करू लागल्या आहेत.एवढेच नव्हे तर भारतीय ग्राहकांमध्ये ही वाहने लोकप्रियही आहेत. कदाचित पेट्रोलच्या वाढत्या किमतींमुळे की काय; पण भारतात वाहनक्षेत्रातील ‘हरितक्रांती’चे मुख्य कारण ग्राहकांकडून असलेला उत्तम प्रतिसाद असल्याचे मानले जाते.२०२२-२३ मध्ये या विजेवरच्या गाड्यांचे उत्पादन मागील वर्षीपेक्षा १५५ टक्क्यांनी वाढून १७ लाख झाले आहे. भारतीय वाहनउद्योग २०३० पर्यंत विषारी वायूउत्सर्जन ४५ टक्क्यांनी कमी करण्याच्या ध्येयाकडे आगेकूच करत असतानाच या बदलामुळे झलेल्या तंत्रज्ञानविकासाचा परिणाम वाहन दुरुस्तीक्षेत्रातल्या अनेक लघु उद्योग आणि सूक्ष्म सेवांवर होणार आहे.सध्या वाहनउद्योगाशी संबंधित नानाविध उद्योग लघु-सूक्ष्म उद्योगक्षेत्रात रोजगार निर्माण करत आहेत. पुण्याच्या आजूबाजूला गाडीतील प्रत्येक भाग तयार करून बजाज, टेल्को इत्यादी मोठ्या कंपन्यांना पुरवणारी हजारो लघु- सूक्ष्म उद्योगांची पुरवठासाखळी आहे.भारतात या क्षेत्रात परदेशी गुंतवणूक येत आहे; परंतु सध्यातरी विजेच्या गाड्यांसाठी लागणारे बहुतेक भाग हे व्हिएतनाम, चीन, जर्मनी इत्यादी देशांमधून आयात केले जातात. लौकरच या आयातीची जागा भारतात परदेशी गुंतवणुकीच्या साहाय्याने बनवलेली उत्पादने घेतील.जसजशी परंपरागत वाहनांची जागा विजेवर चालणारी वाहने घेऊ लागतील, तसतशी वाहनउद्योगावर आधारित जुन्या भागांची आणि ते बनवणाऱ्या लघुउद्योगांसाठीची मागणी कमी होऊ लागेल. या परिस्थितीला या लघु उद्योगांनी कसे सामोरे जावे, याचे ठोस नियोजन कोणत्याही प्रकारे झाल्याचे दिसत नाही.सेवाक्षेत्रात गाडीमध्ये हवा भरण्यापासून, तेल पाणी करणे, इंजिनाचे विविध भाग पुरवणे या व्यवसायांमधील गॅरेज मेकॅनिक आहेत. त्यांच्या सेवांसाठीची मागणीदेखील कमी होऊ लागेल. एकदा मॅकेनिकाकडे गेल्यावर गिअर बॉक्समधले तेल बदलणे, आरसा घट्ट करणे, ब्रेककेबल बदलणे अशा प्रकारची विविध कामे निघून मॅकेनिक रोजगार मिळवत असे.आता नवीन वाहनांमध्ये तेल बदलणे, यासारखी कामे निघणारच नाहीत. एकीकडे जुन्या व्यवसायांवर गदा येण्याची भीती तर दुसरीकडे विजेच्या गाड्यांसाठी योग्य मॅकेनिक मिळणे दुरापस्त अशी परिस्थिती सध्या अमेरिका-ब्रिटनसारख्या काही पाश्चात्य देशांमध्ये दिसते.या नवीन गाड्या दुरुस्त करण्यासाठी जी विशिष्ट साधने लागतात, त्यासाठी पैसे ओतणे या व्यावसायिकांना परवडत नाही. भारततही ‘बॅटरीवरच्या गाडीला हात लावणार नाही’ असे सांगण्यात येते, त्यामुळे नवीन विजेवरची गाडी घेतली तर नेहमीच्या कोपऱ्यावरच्या जुन्या गॅरेजमध्ये सोडता येत नाही.सरकार या नव्या ‘हरितक्रांती’वर भर देऊन विजेवरील वाहनांसाठी परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देत आहे. ग्राहकांनाही बऱ्याच राज्यांमध्ये विविध करांमधून सूट देण्यात आली आहे. परंतु विजेच्या गाड्या दुरुस्त करण्याचे प्रशिक्षण दुर्मिळ आहे.कारण काही राज्यांत सरकारने दोन वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. या क्षेत्रात नव्याने येणाऱ्या तरुणांसाठी तो उपयोगी पडेल. पण जे लाखो लोक परंपरागत वाहनदुरुस्ती करताहेत त्यांच्या भवितव्याचे काय?देश प्रगतिपथावर असताना स्थित्यंतरे अटळ असतात; पण त्यातून आर्थिक विषमता तीव्र होऊ न देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. लघु- सूक्ष्म उद्योग व गॅरेज व्यवसायिक यांनी या स्थित्यंतराला सामोरे जाण्यासाठी काय करावे. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण त्यांना दिल्यास मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीत भर पडण्यापासून देश वाचू शकेल.

# श्वेतपत्रिका की रंगसफेदी?

तुम्हाला चांगले रस्ते आणि वेगवान महामार्ग हवे असतील तर टोल भरण्याची तयारी हवी, असा नागरिकांना प्रेमळ दम देऊन टोलच्या जोखडाखाली व्यवस्थेने आपसूक अडकवून टाकले, याला एव्हाना बराच कालावधी लोटला आहे. आरंभी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेगवान प्रवास आणि तुलनेने रस्त्याची उत्तम स्थिती यामुळे नागरिकांनी हा वाढीव बोजा स्वीकारला. मात्र, कोणत्याही रस्त्यावरची टोल आकारणी ही प्रकल्पाचा खर्च निघाल्यानंतर थांबायला हवी. प्रत्यक्षातले चित्र वेगळेच असून महाराष्ट्रातील प्रमुख टोलनाक्यांवर ‘आचंद्रसूर्य’ टोलवसुली होतच राहणार, असे दिसते. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ‘टोलचा झोल’ नेमका कळावा, यासाठी राज्यातील सर्व टोलनाक्यांविषयी श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून केली होती. आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ म्हणजे ‘एमएसआरडीसी’ने श्वेतपत्रिका प्रकाशित केली आहे. या श्वेतपत्रिकेतील तपशील पाहिले तर महाराष्ट्राने टोलमुक्तीची अपेक्षा सोडून टोलधाडीचीच मानसिक तयारी ठेवायला हवी, असे दिसते. प्रकल्पखर्चाइतकी रक्कम वाहनचालकांकडून वसूल होऊनही टोल बंद किंवा कमी होण्याऐवजी काही ठिकाणी वाढतच चालला आहे. महामंडळाने प्रत्यक्ष टोलवसुली होण्याआधीच कंत्राटदारांकडून अग्रीम रक्कम उचलली असल्यामुळे ती वसूल होईपर्यंत नागरिकांना टोलमुक्त रस्ते मिळणे कठीण असल्याचे या श्वेतपत्रिकेवरून दिसते. ही राज्यातील लक्षावधी नागरिकांची सरळ सरळ फसवणूक असून महामंडळ आणि टोलवसुली करणाऱ्या कंत्राटदार कंपन्या यांच्यातील व्यवहारांचा भुर्दंड त्यांच्या डोक्यावर लादणे, कदापि योग्य ठरणार नाही. या श्वेतपत्रिकेला प्रवाशांनी योग्य त्या न्यायालयीन व्यासपीठावर संपूर्ण आकडेवारी आणि तपशिलासहित पुन्हा एकदा आव्हान देणे आवश्यक असून राज्यातील



सगळ्याच टोलवसुलीबाबत पारदर्शकता आणण्याची गरज आहे.कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेत सर्व नागरिकांना पायाभूत सोयीसुविधा देणे हे सरकारचे कर्तव्यच असते. त्यासाठीच प्राप्तिकरासहित वेगवेगळ्या करांची वसुली सरकार करीत असते. या करसंकलनामधूनच रस्तेही व्हायला हवेत आणि ते सर्व नागरिकांना मोफत वापरण्यास मिळायला हवेत. मात्र, देशात मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे वाहू लागल्यानंतर पैसे टाका आणि अधिक सोयीसुविधा मिळवा किंवा जास्त पैसे भरा आणि प्राधान्याने सुविधा मिळावा; या तद्दन भांडवली विचारप्रणालीने सगळ्याच सरकारी यंत्रणांचा ताबा घेतला. उत्तम सुविधा हव्यात तर पैसे भरायला नकोत का, हा भ्रामक युक्तिवाद कसलाही आगापिछा नसणाऱ्या नव्वदोत्तरी नवमध्यमवर्गानेही उचलून धरला आणि टोलवसुलीला जणू एक वैचारिक अधिष्ठानच प्राप्त झाले. खरेतर, मुळात या संकल्पनेलाच विरोध करायला हवा होता. ‘टोल भराल तर एका तासात पोहोचविणारा रस्ता तुम्हाला मिळेल आणि टोल भरायचा नसेल तर दोन किंवा तीन तासांचा वळसा पडेल,’ असे पर्याय आज देशात अनेक रस्त्यांबाबत आहेत. ही एक प्रकारची आधुनिक वर्णव्यवस्थाच आहे. तिला तत्त्ववैचारिक विरोध करण्याची ताकदच आपला समाज गमावून बसला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे टोलविरोधी आंदोलन हे एक वेगळेच घटित असते. मात्र, निदान त्यांच्या भीती किंवा दहशतीने काही टोल बंद झाले आणि नागरिकांचा त्यातून फायदाच झाला.एमएसआरडीसीनेही आत्तापर्यंत १३ प्रकल्पांचे २२ टोल नाके बंद केल्याची माहिती या श्वेतपत्रिकेत दिली आहे. या प्रकल्पांचा खर्च झाला होता, २८८६ कोटी रुपये आणि वसुली करण्यात आली २९७१ कोटींची. म्हणजे, खर्च वसूल होताक्षणीच टोल बंद करावा, हे एमएसआरडीसीला सुचले नाही. राज्यातल्या टोलवसुलीबाबत संशयाच्या फेऱ्यात सापडलेली एक बाब म्हणजे वसूल होणारा प्रत्येक पैसा योग्यप्रकारे नोंदविला जातो का आणि टोलवसुली करणाऱ्या कंत्राटदार कंपन्या हिशेबाच्या दोन वेगवेगळ्या वह्या तर ठेवत नाहीत ना? मुंबई-पुणे द्रुतगती यशवंतराव चव्हाण महामार्गावर ज्या प्रमाणात वाहने जातील, अशी पहिल्या युती सरकारची अपेक्षा होती; त्याच्या कित्येक पट अधिक वाहने या महामार्गावर आज धावत आहेत. यातले प्रत्येक वाहन टोल भरत आहे. असे असूनही आणखी किमान सहा वर्षे हा मार्ग टोलमुक्त होण्याची शक्यता नाही. या प्रकल्पासाठी २५८५ कोटी रुपये खर्च झाला. मात्र, एमएसआरडीसीने जवळपास दहा हजार कोटी रुपये कंत्राटदारांकडून आधीच घेतले आहेत. ते सारे वसूल होईपर्यंत टोलवसुली चालूच राहणार. मुळात कंत्राटदारांकडून अशी अग्रीम रक्कम घेण्याची पद्धतच चुकीची आहे. महामंडळाला कर्जे हवीत तर ती देण्यासाठी अनेक वित्तसंस्था बाजारात आहेत. या कर्जांना सरकारची हमीही मिळू शकते. मग टोल कंपन्यांकडून महामंडळाने अशा रकमा का घ्याव्यात? आणि आता त्यांचा सगळा बोजा सामान्य प्रवाशांच्या बोकांडी का बसावा? मुळात सरकारी विभागांचे कामच अधिक कार्यक्षम, पारदर्शक करण्याऐवजी सरकारचे मागल्या दाराने कंपनीकरण करण्याची वाट धरली की ‘नफा’ हा उद्देश व्यवस्थेत शिरतो. जो सरकारमध्ये अपेक्षित नसतो. एमएसआरडीसीची श्वेतपत्रिका म्हणजे निव्वळ रंगसफेदी आहे. टोलच्या तिढ्यातून महाराष्ट्राची सुटका करण्याचा मार्ग या हजारो कोटींचे रस्ते बांधणाऱ्या या महामंडळाला सापडलेला दिसत नाही.

# उंच झोक्याचा ‘अर्थ’

शेअर बाजाराने उंच झोका घेतला म्हणून त्या आधाराने निष्कर्षांची मोट बांधणे, हे फारच धाडसाचे असते, याचे कारण अभ्यास-आडाखे, भावना, अंदाज, भीती, भाकीत, विश्वास अशा वेगवेगळ्या गोष्टींचे मिश्रण या हेलकाव्यांना कारणीभूत ठरलेले असते. त्यातून अर्थव्यवस्थेच्या पायाभूत स्थितीविषयी काही निष्कर्ष काढणे, हे सुतावरून स्वर्ग गाठण्यासारखे ठरू शकते.पण काहीवेळा मात्र त्यातून सूचित होणाऱ्या प्रवाहांकडे दुर्लक्ष करता येत नाही. सेन्सेक्सने उसळी घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी थोडी माघारही घेतली, तरीपण निर्देशांकाने सत्तर हजाराच्या मुक्कामाला केलेला स्पर्श ही घटना नक्कीच दखलपात्र आहे. भारतीय अर्थव्यवस्थेपुढे अनेक प्रश्न आणि आव्हाने आहेतच आणि त्यांना तोंड देण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे, यात कोणतीही शंका नाही.मात्र सेन्सेक्समुळे दिसणारे काही उजेडाचे ठिपके पुढच्या वाटचालीसाठी प्रेरक ठरतील, असे नक्कीच म्हणता येते. अनेक बड्या देशांना जाणवत असलेले आर्थिक ताण, त्यातच दोन ठिकाणी सुरू असलेले युद्ध, खनिज तेलाचे वाढणारे दर अशा अनेक कारणांच्या सावल्या जगभरातील शेअर बाजारांवर दिसत असल्या तरी भारतातील स्थिती आशादायक दिसते आहे, हे नाकारता येणार नाही.रूळ बदलताना नेहेमीच खडखडाट होतो; आपल्याकडे जरा जास्तच. त्यामुळे आर्थिक सुधारणांच्या प्रत्येक टप्प्यावर विरोध तर झालाच; पण त्या बरोबरीनेच एकूण आर्थिक चित्र निराशाजनक रंगवले गेले. एका पाठोपाठ एक येत गेलेल्या संकटांमुळे ते आणखीनच गडद होत गेले. परंतु सगळाच अंधार नाही, हे वास्तव समजून घेण्यासाठी सेन्सेक्सची ऐतिहासिक झेप हे निमित्त योग्य ठरेल.२०१७ मध्ये वस्तू व सेवा कर (जीएसटी) आणल्यानंतर त्यातून निदान एक लाख कोटीचा महसूल जमा होईल का, याविषयीदेखील साशंकता व्यक्त होत होती. त्या शंका-कुशंकांची जळमटे भेदून आता ऋजीएसटी’चा महसूल एक लाख साठ हजार कोटींवर गेला आहे. पण हा मुद्दा केवळ एवढ्यापुरता मर्यादित नाही.स्थानिक करांच्या वसुलीसाठी ठिकठिकाणी मालवाहतुकीचे ताटकळणारे ट्रक, त्यामुळे माल पोचविण्यात लागणारा विलंब, दीर्घ प्रतीक्षेमुळे होणारी इंधनाची नासाडी या गोष्टी जीएसटी आल्यामुळे टळल्याचा फायदा नक्कीच होतो. त्यातही वेळ वाचणे हा फायदा महत्त्वाचा. पायाभूत सुविधांच्या विकासाचा भागही यात आहे. रस्ते चांगले झाल्यानेदेखील मालवाहतूक वेगाने होते.कंपन्यांचे उत्पन्न वाढल्याने त्याचा सकारात्मक परिणाम नक्कीच शेअर बाजारावर पडतो. सध्याच्या उसळीला बुडबुडा म्हणता येणार नाही. काही विशिष्ट कंपन्यांच्या बाबतीत तसे आहे; परंतु समग्र विचार करता हा झोका नक्कीच आशावादही उंचावणारा आहे. थकित-बुडिताच्या प्रश्नाने गांजलेल्या बँकिंगच्या क्षेत्रात झालेल्या स्वच्छता मोहिमेनंतर तेथेही परिस्थिती सुधारलेली आहे.पण या सगळ्यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा हा मागणीचे गोठलेपण दूर करणारा आहे. हळूहळू देशांतर्गत मागणी वाढत आहे, हे सुचिन्ह. त्यामुळेच परकी वित्तसंस्थांच्या हालचालींनुसार




हिंदकळणारा निर्देशांक आता मात्र देशांतर्गत परिस्थितीच्या घटकालाही ठळक प्रतिसाद देताना दिसतो आहे. अमेरिकेतील व्याजदर वाढले की परकी वित्तसंस्था तिकडे वळतात. याचा परिणाम आपल्या शेअर बाजारातील घसरणीत होतो.परंतु तेथील व्याजदरवाढ थांबली आहे. शिवाय तेथील महागाईदरही कमी झाला आहे. सेन्सेक्सच्या झोक्याला या सगळ्या गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत. यातून भारताला जो ‘संधि’प्रकाश दिसतो आहे, तो लक्षात घेऊन प्रयत्नांची गती वाढवायला हवी. वस्तुनिर्माण क्षेत्राकडे लक्ष देऊन तिथे आणखी वाढ कशी होईल, हे पाहायला हवे. उद्योगपूरक धोरणे हवीतच.भारतात अलीकडे त्यावर जवळजवळ सहमती दिसते. प्रश्न निर्माण होतो तो तपशीलाचा. त्या बाबतीत सरकारच्या कौशल्याचा कस लागेल. याचे कारण आर्थिक-औद्योगिक प्रगतीसाठी धोरणात्मक सातत्य हवे असते. चढउतारांच्या परिस्थितीतही ते टिकवणे हे देशांतर्गत पातळीवरच नव्हे तर जागतिक पातळीवरही देशाची विश्वासार्हता वाढविणारे असते. गुंतवणूकदार त्याचा विचार करतात.बऱ्याच बाबतीत ते दिसत असले तरी अनेकदा राजकीय अपरिहार्यता वरचढ ठरतात आणि त्यापुढे सरकार वाकते. कांदा निर्यातबंदीच्या निर्णयाचे उदाहरण ताजेच आहे. पूर्वलक्ष्यी प्रभावाने कर आकारणे, करदात्यांच्या पैशातून खिरापती वाटणे, त्यात स्पर्धा करणे यापेक्षा दूरगामी आर्थिक धोरणे आखली तर अर्थव्यवस्थेला त्याचे फायदे मिळतात.झोका जसा उंच जातो, तसाच तो खालीही येऊ शकतो; परंतु पायाभूत स्थिती उत्तम असेल तर त्याची काळजी करण्याचे कारण नसते. रिझर्व्ह बँकेने भारताच्या आर्थिक वाढीच्या दराचा आधीचा अंदाज बदलून तो सात टक्क्यांजवळ राहील, असे म्हटले आहे. इतर पतमानांकन संस्थांनीही आधीच्या अंदाजापेक्षा भारताची वाढ चांगली होईल, असा निर्वाळा दिला आहे. आता आव्हान आहे ते मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले आहे ना पकोडे तळा-संजय राऊत

**नागपूर**-अजित पवार हे सध्या भाजपसोबत आहेत, आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे ना की पकोडे तळा अशी खोचक प्रतिक्रिया अजित पवार यांच्या पीएचडीवरील वक्तव्यावर खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. अनेक ठिकाणी अजित पवारांच्या वक्तव्याच्या निषेध करण्यात आला असून विद्यार्थी रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळत आहे.दरम्यान संजय राऊत् पुढे बोलताना म्हणाले की, लोकशाही असलेल्या देशात अशाप्रकारची घटना घडू नये. विरोधकांचा मुद्दा ऐकायचा नाही हे चुकीचे आहे. विरोधक लोकशाहीचा एक स्तंभ आहे आणि तुम्ही तो पोकळ करत आहे. तुम्ही जर त्याला प्रतिसादच देत नसाल तर आमच्याकडे बॉयकॉट करण्याशिवाय पर्याय नाही, असे संजय राऊत म्हणाले आहेत. तर शिवसेनेला जरी धनुष्यबाण आणि नाव दिले असले तरी त्यांना खात्री आहे की त्याचे डिपॉझिट जप्त होईल म्हणूनच ते भाजपच्या कमळावर निवडणूक लढवत आहे, धनुष्यबाण आमचा म्हणणारे कमळाबाईचे गुलाम होत आहेत, असा घणाघात संजय राऊतांचा शिंदे गटावर केला आहे.सारथी, महाज्योती, बार्टी या संस्थांमध्ये आम्हाला पीएचडी करण्यासाठी अॅडमिशन द्या, शिष्यवृत्ती द्या, अशी मागणी केली जात आहे. त्याची संख्या एवढी वाढली की एवढ्या विद्यार्थांना पीएचडीसाठी शिष्यवृत्ती देणे गरजेचे आहे का? अशी मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. त्यानंतर सारथीमध्ये २०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे, असे अजित पवार म्हणाले. अजित पवार यांचं बोलून झाल्यानंतर काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी अजित पवारांना काही प्रश्न विचारले. फेलोशिपसाठी २९ मार्चला जाहीरात प्रसिद्ध केली. त्यात कोणतीही अट नव्हती. त्यानंतर सहा महिन्याने २०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची आपण अट टाकली. त्याआधी १३०० विद्यार्थ्यांनी फेलोशिपसाठी अर्ज केले. फेलोशिप मिळेल, अशी त्यांना आशा होती. त्यामुळे २०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची अट आपण पुढच्या वर्षीपासून लागू करावी, अशी विनंती आहे, असे सतेज पाटील म्हणाले. तेव्हा त्याला उत्तर देताना अजित पवार यांनी एक वक्तव्य केले. फेलोशिप घेऊन काय करणार? त्यावर फेलोशिप घेऊन पीएचडी घेतील ना, असे सतेज पाटलांनी म्हटले. पीएचडी करून काय करणार आहेत? काय दिवा लावणार आहेत? असा प्रतिसवाल अजित पवार यांनी केला. त्यावर असे कसे म्हणता दादा?, असे सतेज पाटील म्हणाले.विधान परिषदेतील या वक्तव्यामुळे अजित पवार यांना समाजमाध्यमांवर ट्रोल केले जात आहे. पीएचडी करणारे विद्यार्थी अजित पवारांविरोधात नाराजी व्यक्त करत आहेत. तर काहींनी अजित पावारांच्या या वक्तव्याचा निषेध नोंदवला आहे.

# आमदार अपात्रता प्रकरणी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ:सर्वोच्च न्यायालयाचा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना दिलासा

**नवी दिल्ली–**शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात राहुल नार्वेकर यांनी याचिकेत तीन आठवडे वाढवून देण्याची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने केवळ १० दिवसांचा वेळ दिला. त्यामुळे आता शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी राहुल नार्वेकर यांना १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर अधिवेशन सुरु असतानाही सुनावणी सुरु आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना या प्रकरणी ३१ डिसेंबरपर्यंत निकाल द्यावा लागणार होता. तसे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. आता या प्रकरणात मोठी माहिती समोर आली आहे. आमदार अपात्रता प्रकरणात दोन लाख पानांचे कागदपत्रे तयार असून सहा निकाल लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या ३४ याचिकांचे सहा गटांत वर्गीकरण केल्यामुळे विविध सहा निकाल लागणार असल्याचे समजते आहे. विधीमंडळ सचिवालयाकडून सुनावणी कार्यवाही २० डिसेंबर पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच या संदर्भात विधीमंडळाकडून सर्वोच्च न्यायालयात तीन आठवड्यांचा कालावधी मागितला गेला होता. त्याला आता १० दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.सध्या विधानसभेत शिवसेना आमदारांच्या अपात्रता प्रकरणी अंतिम सुनावणी सुरु आहे. या प्रकरणाची अंतिम सुनावणी १८ ते २० डिसेंबर या तीन दिवसांत पूर्ण होणार आहे. २१ ते ३१ डिसेंबर या कालावधीत निकालाचे लेखन अशक्य होते. मात्र निकालाचे लेखन करण्यासाठी अधिकचा वेळ लागण्याची शक्यता आहे. एक हजारांहून अधिक प्रश्नांच्या उत्तराचे वाचन करण्याचे आवाहन विधीमंडळासमोर आहे. नागपूरवरून मुंबईत कागदपत्रे नेण्यासाठी देखील वेळ लागणार आहे. त्यामुळे सहा निकाल लावण्यासाठी अधिकच्या वेळेची मागणी करण्यात आली होती.विधीमंडळाकडून सर्वोच्च न्यायालयात तीन आठवड्यांची वेळ मागितली होती. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात विधीमंडळाकडून याचिका दाखल करण्यात आली होती. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे. त्यात सातत्याने सकाळ आणि संध्याकाळी जवळपास दररोज सात तास सुनावणी घेऊन साक्ष पूर्ण करण्यात आल्या आहेत. आता पुढील कार्यवाही पूर्ण करून हे प्रकरण निकालासाठी बंद करण्याचे मी प्रस्तावित केले आहे. त्या अनुषंगाने सर्वांच्या सहकार्याने २० तारखेपर्यंत हे कार्य पूर्ण करायचा माझा प्रयत्न असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटले होते. मात्र, नार्वेकरांना केवळ १० दिवसांचा कालावधी वाढवून देण्यात आला आहे.



# आंतरवाली सराटी दगडफेक प्रकरण ऋषिकेश बेदरेला जामीन मंजूर

**छत्रपती संभाजीनगर–**आंतरवाली सराटी येथील उपोषणास्थळी झालेल्या दगडफेक प्रकरणातील मुख्य आरोपी ऋषिकेश बेदरेला जामीन मंजूर झाला आहे. मुंबई उच्च न्यायलयाच्या औरंगबाद खंडपीठाने एक लाख रुपयाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. मात्र जालना आणि बीडला जाता येणार नाही. सत्र न्यायालयाने अर्ज फेटाळल्यांतर हायकोर्टाने दिलासा देताना जामीन मंजूर केला आहे. जामीन मिळावा अशी याचिका ऋषिकेश बेदरेने केली होती.सराटी येथील दगडफेक व जाळपोळ प्रकरणी गोंदी पोलीस स्टेशनमध्ये ऋषिकेश बेद्रे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गावठी पिस्टल प्रकरणी ही अटक केली होती. सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर ड. विशाल कदम यांच्या मार्फत हायकोर्टात जामीन अर्ज दाखल केला होता. गुरुवारी न्या. एस. व्ही चपळगावकर यांच्या खंडपीठ समोर वरिष्ठ विधीज्ञ व्हीं. डी. सपकाळ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून खंडपीठाने जामीन दिला आहे.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वात उपोषण सुरु होते. या दरम्यान पोलिसांवर झालेल्या दगडफेकीनंतर पोलिसांनी लाठीचार्ज केला होता. त्याचे पडसाद राज्यभरात उमटले होते. या प्रकरणात पोलिस आणि स्थानिक आंदोलक यांनी एकमेकावंर आरोप प्रत्यारोप केले होते. यातील मुख्य आरोपी ऋषीकेश बेदरेसह त्याच्या ३ सहकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली.मराठा समाजाच्या आंदोलनादरम्यान आंतरवाली सराटीमध्ये दगडफेक आणि जाळपोळ झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी कारवाई सुरु केली आहे. पोलिसांनी यातील मुख्य आरोपी ऋषिकेश बेदरेला अटक करण्यात आली होती.या आरोपीकडे पिस्तुल आणि जिवंत काडतूस सापडली आहेत. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, त्यानंतर पोलिसांकडून सुरू असलेल्या चौकशीत आणखी गंभीर बाब समोर आली आहे. ऋषिकेश बेदरेवर तब्बल १५ गुन्हे विविध पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी देखील यांसदर्भातील माहिती जाहीर केली.पोलिसांच्या या कारवाईनंतर मराठा आंदोलनातील ऋषिकेश बेदरे वर शंका उपस्थित होऊ लागल्या. याशिवाय मनोज जरांगे यांच्यासोबत या आंदोलनामध्ये सुरुवातीपासून सक्रिय असलेल्या ऋषिकेश बेदरे याची नेमकी आंदोलनात भूमिका काय होती? असा प्रश्न देखील उपस्थित होतोय.आंतरवाली सराटीच्या मराठा क्शन आंदोलनामध्ये ऋषिकेश बेदरेचा मोठा सहभाग होता. लाठीमारच्या घटनेपूर्वी एका चॅनलकडे असलेल्या एका व्हिडिओत ऋषिकेश बेदरे छगन भुजबळांच्या विरोधात घोषणाबाजी करताना पाहायला मिळतो. याशिवाय पुढच्या संपूर्ण आंदोलनामध्ये तो मनोज जरांगे यांच्या आजूबाजूला पाहायला मिळतो. अनेक फोटोमध्ये आणि दृश्यांमधून जरांगे आणि बेदरे एकमेकांना बोलताना दिसत आहेत. तर, याच घटनेबाबत जरांगे यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी माध्यमांकडे प्रतिक्रिया दिली. आंतरवाली सराटी प्रकरणात पोलिसांकडून करण्यात आलेली अटक सरकारचा डाव असल्याचा आरोप जरांगे यांनी केला.

# छगन भुजबळांचा गैरसमज झाला असेल तर बोलून दूर करण्यात येईल– पवार

**नागपूर–**कालच्या पुरवणी मागण्यांमध्ये सारथी, बार्टी, महाज्योती यांना मोठी तरतूद केली आहे. ती मंजूर पण झाली आहे. राज्यकर्ते कुणीही असले तरी, असा भेदभाव करता येत नाही. भुजबळांना काही गैरसमज झाला असल्यास त्यांच्याशी बोलून तो दूर करण्यात येईल. तसेच, त्यांचे म्हणणे बरोबर असल्यास तशी दुरुस्ती करण्यात येईल असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, दूध, कांदा आणि इथेनॉल प्रश्नावर आम्ही काल सहकारमंत्री अमित शहा यांच्यासोबत बोललो आहोत. दुधाची पावडर निर्यात करण्याचा निर्णय झाल्यास त्याचा देशभरातील दूध उत्पादकांना मदत होईल, असे सांगितले. तर कांदा आणि इथेनॉलबाबत शनिवारी आम्ही भेट घेणार आहोत, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.अजित पवार म्हणाले की, नाना, काका, बाबा, अण्णा, बापू, सोम्या-गोम्या, कोण काय बोलले हे मला विचारू नका. ते विरोधीपक्षाचे नेते आहेत, त्यांना बोलावेच लागेल. ते सरकार चांगले काम करतेय असे म्हणणार आहे का, असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लगावला. तसेच राज्यात महायुतीच्या सरकारमध्ये अजित पवार गटाकडून सहभागी झालेले मंत्री छगन भुजबळ यांचा गैरसमज दूर करणार असल्याची भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिवेशनकाळात पीएचडीबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. यावरुन विरोधकांनी अजित पवारांवर टीका केली आहे. यावरुन अजित पवारांनी देखील विरोधकांवर पलटवार केला आहे. इतकेच नाही तर या संदर्भात आपण दिलगिरी देखील व्यक्त केली असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. पीएचडीबाबत माझा तोंडातून शब्द गेला की 'काय दिवा लावला जाणार'. त्याचा गाजावाजा करण्यात आला असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. मी दिलगिरी व्यक्त केली आहे, असे स्पष्टीकरण अजित पवारांनी दिले आहे. पीएचडी करण्याबाबत विषय निवडीबाबत समिती नेमायला हवी असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

# आमदार प्रणिती शिंदे अधिवेशनात पुन्हा आक्रमक

**सोलापूर :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात मागील काही महिन्यांपासून सिटीस्कॅन मशीनच नाही. वारंवार पाठपुरावा करूनही ते मिळाले नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत.दुसरीकडे महिला व बालकांसाठी १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधून तयार आहे, पण फर्निचरच्या किरकोळ कारणांमुळे ते सुरू होत नाही, यावर आमदार प्रणिती शिंदे यांनी अधिवेशनात बुधवारी (ता. १३) आवाज उठविला.आमदार प्रणिती शिंदे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये औषधे नाहीत, अशी एकही तक्रार माझ्याकडे नाही. जरी तशी काही मागणी असल्यास त्याची आठ दिवसांत पुर्तता केली जाईल, अशी ग्वाही दिली.त्यानंतर आमदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, माझ्या प्रश्नातील काय लागले हे माहिती नाही. मात्र, मी मुख्यमंत्र्यांसह वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या सचिवांना पत्र दिले. तरीसुद्धा त्याची पूर्तता झाली नाही म्हणून मंत्र्यांना हा प्रश्न विचारला, असेही त्यांनी स्पष्ट केले.मंत्र्यांनी दिलेली चुकीची माहिती रेकॉर्डवरून काढून टाकावे, अशी विनंतीही केली. त्यावेळी विधानसभा अध्यक्षांनी आमदाराने पत्र दिल्यावरच काम करावे, असा कोणताही नियम नाही. आमदार प्रणिती शिंदे यांनी विचारलेल्या प्रश्नांचे स्पेसेफिक उत्तर द्यावे, असेही अध्यक्षांनी स्पष्ट केले. तर चुकीचे काही असेल तर ते रेकॉर्ड तपासून काढले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.



# भाजपसोबत जाण्याच्या ३ पत्रावर रोहित पवारांच्या सह्या:आमदार सुनील शेळके

**नागपूर–**रोहित पवारांनी भाजपसोबत सत्तेत सहभागी होण्याच्या पत्रावर तीन वेळा सह्या केल्या असल्याचा गौप्यस्फोट आमदार सुनील शेळके यांनी केला. सुनील शेळके यांनी त्यासंबंधित तीन तारखाही जाहीर केल्या. २२ जून, २ जून आणि त्याच दिवशी म्हणजे २ जुलै रोजी अशा तीन पत्रांवर रोहित पवारांनी सह्या केल्याचा दावा आमदार सुनील शेळके यांनी केला आहे.दरम्यान सुनील शेळके पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात स्वयंघोषित संघर्ष योद्धा म्हणून ज्यांनी यात्रा काढली त्यांना अजित पवार यांच्यावर बोलायचं अधिकार नाही. कारण अजित पवार यांनी इतरांच्या मतदारसंघापेक्षा रोहित पवार यांच्या मतदारसंघात सर्वात जास्त निधी दिला आहे. ते स्वःच्या काकाचे होऊ शकले नाहीत ते आमचे नेते कसे काय होतील? पक्ष कसा काय सांभाळतील?, असा सवाल उपस्थित केला आहे.सुनील शेळके म्हणाले की, अजित पवार यांनी दुसरी पिढी निर्माण केली नाही असे ते म्हणतात मग सुनिल शेळके, नीलेश लंके, राज नवघरे या सर्व सामान्य लोकांना संधी कुणी दिली? जितेंद्र आव्हाड यांनी स्वतःला सोडून दुसऱ्याला कुणाला निवडून आणले हे जाहीर करावे. पहाटेचा शपथविधी, महाविकास आघाडीतून बाहेर जाऊन भाजप सोबत जाणे आणि आता महायुती मध्ये सहभागी होणे हे सर्व निर्णय सर्वानुमते होती.२२ जून २०२२- भाजप सोबत गेले पाहिजे, अजित पवार जे म्हणतील त्याला आपला पाठिंबा असेल आणि एक पत्र तयार करण्यात आले. ज्यामध्ये भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेण्यात आला. ४७ आमदार त्यावेळी उपस्थित होते. या पत्रात माझ्या आधी रोहित पवार यांनी सही केली होती. या पत्रावेळी अजित पवार यांनी सांगितले की भाजप सोबत आपल्याला जायचे नाही. त्यांनी नकार दिला.२ जुलै २०२२- विरोधी पक्षनेते करा यासाठी समर्थन, माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली- वाय बी चव्हाण सेंटर येथे बोलण्यात आली होती. नाशिकचे आमदार माणिकराव कोकाटे यांनी पुढाकार घेतला आणि अजित पवार यांना विरोधी पक्षनेते करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावर ३२ आमदारांनी सह्या केल्या होत्या. सत्तेत जायचे ठरले होते त्यावेळी ५२ आमदार यांनी सह्या केल्या होत्या.



# सरस फूड फेस्टिव्हल: दिल्लीकरांनी दिली महाराष्ट्रातील खाद्यपदार्थ्यांना पसंती

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या सरस फूड फेस्टीवलमध्ये महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांना खवय्यांनी पसंती दिली असून दिल्लीकर खवय्ये सावजी मटण, चिकन, मांडा, झुणका-भाकर, भरीत भाकरी, महाराष्ट्रीयन थाळी,वडापाव, मिसळपाव आणि पुरण पोळीचा मनसोक्त आस्वाद घेत आहे.कनॉट प्लेस येथील बाबा खडक सिंह मार्गावर १-१७ डिसेंबर २०२३ दरम्यान सरस फूड फेस्टिव्हल भरण्यात आले आहे. केंद्र सरकारचे ग्रामीण विकास राज्यमंत्री फग्गन सिंग कुलस्ते यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.केंद्रीय ग्रामीण मंत्रालयाच्या च्या 'राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान' या प्रमुख कार्यक्रमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला उद्योजक आणि महिला बचत गट या महोत्सवात सहभागी झाले आहेत. महिलांना मोठ्या प्रमाणावर सक्षम करण्यासाठी एमओआरडीचा हा उपक्रम आहे. या फेस्टिव्हलमध्ये २१ राज्यांतील १५० महिला उद्योजिका आणि महिला स्वयं-सहायता व बचत गट सहभागी झाले असून एकूण ३० स्टॉल लावण्यात आले आहेत. या महिलांनी आपापल्या राज्यातील विविध प्रकारचे पारंपारिक खाद्यपदार्थ बनवून खवय्यौंचे लक्ष वेधून घेतले आहे.या फूड फेस्टिव्हल मध्ये महाराष्ट्रातील तीन स्टॉल्स लावण्यात आले आहेत. या मध्ये नाशिक, जळगाव व बीड जिल्ह्यातील महिला बचत गटांचा समावेश आहे. नाशिक येथील निफाड तालुक्यातील 'सर्वज्ञ' महिला बचत गटाच्या स्टॉलवर मांडा, खांडा, धिरडा, झुणका भाकर, भरीत-भाकर, तर जळगाव येथील गंगासागर महिला बचत गट यांनी मिसळ पाव, वडापाव, पुरण पोळी, थालीपीठ, भजी, महाराष्ट्रीयन थाळी, भरडधान्यांची भाकरी सह पिठलं, शेव भाजीला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील रुक्मिणी महिला बचत गट यांच्या स्टॉलवर सावजी मटण, चिकन, पुरण पोळी, ज्वारी, बाजरी व तांदळाच्या भाकरीसह नॉनवेज खाणा-या खवय्यांची गर्दी दिसत आहे.प्रथमच देशाच्या राजधानीत स्टॉल्स लावण्याची संधी मिळाल्याने नाशिकच्या वंदना मांडरे-पद्मावती व छाया झंवझाळ खूपच आनंदी आहेत. खवय्यांनी पारंपारिक पदार्थांना चांगला प्रतिसाद दिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.जळगावच्या वैशाली बारी यांनी घरी जे पदार्थ सहज बनविले जातात तेच पदार्थ देशाच्या राजधानीतील खवय्यांसमोर तयार करून त्यांना खाऊ घालून, त्यांच्याकडून मिळालेली दाद, मनाला सुखवून जाते अशी प्रतिक्रिया दिली.परळी मधील विमल जाधव यांनी, आपला अनुभव कथन करताना म्हणतात, या फेस्टिवलमुळे आम्हाला पाककौशल्य दाखवण्याची आणि आपल्या राज्याची खाद्य संस्कृतीची देशातील लोकांना ओळख करून देण्याची संधी मिळाली आहे, असे सांगत त्यांनी पुढच्या वर्षीही या फेस्टिवल मध्ये सहभागी होण्याबाबतची इच्छा व्यक्त केली. या फेस्टिवलमध्ये ब्लॅक चिकन करी, ब्लॅक राईस खीर, आसाममधील मशरूम करीसह चिकट भात, कैर सांगरी, गट्टे की सब्जी, बाजरी रोटी, राजस्थानची प्याज कचोरी, पश्चिम बंगालची फिश करी, हैदराबादी दम मटण बिर्याणी, तेलंगाना बिर्याणी यांचा समावेश आहे. केरळमधील मलबार बिर्याणी, बिहारमधील लिट्टी चोखा, उत्तराखंडमधील झुनेर की खीर आणि पंजाबमधील मक्के की रोटी सरसों का साग, चना भटोरा. फूड फेस्टिव्हलमध्ये ते अरुणाचल प्रदेश, मिझोराम, सिक्कीम, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश आणि गुजरातमधील स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेऊ शकतात.






# इरई नदी पूररेषेच्या पुनर्सर्वेक्षणाचे पालकमंत्री मुनगंटीवार यांचे निर्देश

## पूर नियंत्रण रेषा निश्चितीबाबत नागपूर येथे आढावा

**नागपूर । प्रतिनिधी**

इरई नदी ही चंद्रपूर शहरालगत असून सरासरी सात किलोमीटर ती शहराला समांतर वाहते. सन २०१३, २०२० तसेच २०२२ मध्ये इरई नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला होता. मात्र इरई नदीला पूर आल्यानंतर व धरणाचे सर्व गेट उघडल्यानंतरही काही भागात गत २० वर्षात कधीही पाणी पोहचले नाही, असा एम.आर. सॅकचा अहवाल आहे. त्यामुळे वास्तविक स्थिती लक्षात घेऊन प्रात्यक्षिक सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. केवळ कागदोपत्री आणि जुजबी सर्व्हेचा आधार घेतला तर शहराचे नुकसान होईल आणि अवैध बांधकामे वाढतील. त्यामुळे संबंधित यंत्रणेने पुन्हा एकदा वस्तुस्थितीदर्शक सर्वेक्षण करावे, अशा सुचना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.नागपूर येथील हरिसिंग वनसभागृहात इरई नदी पूर नियंत्रण रेषा निश्चितीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. , जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता पद्माकर पाटील, चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

पूररेषा दर्शक नकाशानुसार चंद्रपूर शहरातील निळी पूररेषा बाधित क्षेत्र हे सुमारे ४५० हे.आर. आहे. चंद्रपूर शहर हे तिनही बाजुंनी जंगलाने वेढलेले असल्याने शहराच्या विकासासाठी हेच क्षेत्र शिल्लक आहे. आता या क्षेत्रातील विकास परवानग्या थांबविण्यात आल्यामुळे या क्षेत्रात अनधिकृतपणे बांधकामे सुरू झाली आहेत. कोणत्याही नदीची पूररेषा ठरविणे ही पाटबंधारे विभागाच्या अधिकार क्षेत्रातील बाब असून त्यासंबंधी सर्व्हेक्षण करणे, प्रतिकृती अभ्यास करणे, नकाशा तयार करणे व मंजूर करणे ही पाटबंधारे विभागाची जबाबदारी आहे. नदीच्या पूररेषा संदर्भाने सर्व्हेक्षण किंवा प्रतिकृती अभ्यास करणे ही बाब चंद्रपूर महानगर पालिकेच्या अधिकार क्षेत्रातील नसून याबाबत शासनाकडून कोणतेही अधिकृत आदेश प्राप्त नाही.दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीच्याअनुषंगाने २ ऑगस्ट २०१३ व १५ जुलै २०२२ रोजीचा इरई नदी पूररेषेचा मायक्रोवेव सॅटलाईट डाटा तसेच नकाशा प्राप्त करण्याकरीता एम.आर.सॅक नागपूर यांना शुल्क अदा करण्यात आले आहे. एम.आर. सॅकचे संचालक यांच्याकडून प्राप्त नकाशानुसार दि. २२ नोव्हेंबर २०२३ रोजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना पूर रेषेबाबतचा अहवाल सादर करण्यात आल्याची माहिती चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्यावतीने देण्यात आली.



# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने हृदय शस्त्रक्रियेसाठी चंद्रपुरातील बालके मुंबई फोर्टीस हॉस्पिटल मध्ये दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑक्टोंबर २०२३ रोजी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व



मस्त्य व्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने श्री माता कन्यका सेवा संस्था व मुंबई येथील फोर्टीस हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत हृदयविकार तपासणी शिबिर चंद्रपूर येथील वन अकादमीमध्ये घेण्यात आले होते. तपासणीदरम्यान ६४ बालकांना हृदय विकारासंबंधी आजार आढळले ,त्यामुळे पहिल्या टप्प्यात गुरुवार, १४ डिसेंबर २०२३ रोजी २५ बालकांना हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी मुंबईतील फोर्टीस हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे. फोर्टीज हॉस्पिटलमध्ये या बालकांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. श्री माता कन्यका सेवा संस्था चंद्रपूर सातत्याने हृदयरोग मोफत तपासणी शिबिर, कर्करोग तपासणी शिबिर, नेत्रचिकित्सा शिबिर घेत आहे. शिबिरात शस्त्रक्रियेकरिता पात्र असलेल्या रुग्णांना मुंबई, सेवाग्राम, दिल्ली, हैद्राबाद व बेंगरूळ इत्यादी ठिकाणी विनामूल्य शस्त्रक्रिया करुन घेत आहे. त्यामुळे गरिब नागरिकांना मोठा दिलासा मिळून पुढील आयुष्य सुदृढ जगण्याकरिता मदत होत आहे. त्यातून अनेक कुटुंब उद्धस्त होण्यापासून वाचविण्यात येत आहेत. मुंबई येथे श्री माता कन्यका सेवा संस्थेचे सचिव राजेश्वर सुरावार व शैलेंद्रसिंग बैस यांच्या नेतृत्वाखाली बालकांना शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आले. यावेळी भाजपाचे माजी महानगर अध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, माजी जिल्हा परिषद सभापती ब्रीजभूषण पाझारे, रुग्णसहाय्यक सागर खडसे उपस्थित होते. श्री माता कन्यका सेवा संस्थेची स्थापना २०१७ मध्ये झाली. त्यानंतर संस्थेच्यावतीने सातत्याने आरोग्य सेवा केली जात आहे. नेत्र चिकित्सा शिबिराअंतर्गत आतापर्यंत एक लाखाहून अधिक लोकांची नेत्र तपासणी करण्यात आली. ४८ हजार रुग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. श्री माता कन्यका सेवा संस्थेच्यावतीनेच १२ हजार रुग्णांवर सेवाग्राम येथे नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आली. कोरोना काळातही संस्थेने मोठ्या प्रमाणात नागरिकांची सेवा केली. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा असो किंवा वैद्यकीय सोयी, प्रत्येक कार्यात संस्था नेहमीच आघाडीवर असते.

# आनंद निकेतन महाविद्यालयात विज्ञान प्रदर्षनी चे आयोजन



**वरोरा । प्रतिनिधी**

विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण व्हावी, विज्ञान विषय त्यांना सोपा वाटावा व जे विज्ञान शाखेचे विद्यार्थी नाहीत त्यांनाही विज्ञान समजावे या संकल्पनेतून दिनांक १५.१२.२३ रोजी आनंद निकेतन कनिष्ठ महाविद्यालय येथे विज्ञान प्रदर्षानी चे आयोजन करण्यात आले. जीवशास्त्र, भौतिक शास्त्र, रसायनशास्त्र, इलेक्ट्राणिक्स या विविध विषया वर आधारित वर्किंग मॉडेल्स विद्यार्थ्यांनी तयार केले.प्रदर्शनी चे उद्घाटन प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांचे हस्ते व उपप्राचार्य राधा सवाने यांचे उपस्थितीत झाले. प्रदर्शन आयोजन करिता प्रा.किरण लांजेवार आणि प्रा.सोनारखन यांचे विशेष सहकार्य लाभले. प्रयोगशाळा परिचर नागपुरे व वसाके यांचेही सहकार्य लाभले

# पद्मराज चव्हाणचे वैदिक मॅथ स्पर्धेत घवघवीत यश



पुलगाव – अमरावती येथे पार पडलेल्या ९ व्या आंतरराष्ट्रीय अबॅकस अँड वैदिक मॅथ स्पर्धेत वर्धेच्या पद्मराज प्रणय चव्हाण याने प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला. त्याने या यशाचे श्रेय आई-वडील, काका-काकू व जीनियस किड्स अकॅडमीच्या वैदिक मॅथ शिक्षिका पूजा बकाले यांना दिले. पद्मराज चे या यशाबद्दल सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# आ.मेघना दिदी बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली राजकारणात महिलांनी सक्षमपणे उभे राहावे

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखाजी शर्मा यांचे प्रतिपादन

**जिंतूर । प्रतिनिधी**

जिंतूर सेलू विधानसभा क्षेत्रातील महिला लोकप्रतिनिधींचा लोकप्रिय आमदार मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांच्या संकल्पनेतून रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी भाईंदर,मुंबई येथे कार्यशाळा घेण्यात आली. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी भाईंदर,मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या,महिला जिल्हा परिषद सदस्या,पंचायत समिती सदस्या,महिला सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्या,यांची सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली.त्यामध्ये सेलू व जिंतूर तालुक्यातील विविध पदावर कार्यरत असणाऱ्या महिला मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या समारोप सत्रासाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखाजी शर्मा, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या सरचिटणीस रेखा महाजन,जयंत कुलकर्णी आदि उपस्थित होते. शिबिरात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखाजी शर्मा यांच्या हस्ते सहभागी महिला भगिनींना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात



आला.रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी भाईंदर,मुंबई येथे महिलांना शिबिराची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल सहभागी महिला भगिनींनी आमदार मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांचे जाहीर आभार मानले.

# केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिप सिंग पुरी आज वरोरामध्ये

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदिप सिंग पुरी आज ( दि.१६ डिसेंबर) वरोरा तालुक्यात येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.शनिवार, दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी २.५५ वाजता वरोरा तालुक्यातील खेमजई येथे आगमन. दुपारी ३ वाजता कार्यक्रम स्थळी विविध स्टॉलची पाहणी. व लाभार्थ्यांशी संवाद साधतील. दुपारी ३:४० वाजता पत्रकारांशी चर्चा करतील. सायंकाळी ४.२५ वाजता खेमजई (ता. वरोरा) येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

# थेरला शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

थेरला शाळेची शैक्षणिक सहल दिनांक ०६डिसेंबर २०२३ ते ११ डिसेंबर २०२३ या कालावधीत संपन्न सहलीच्या मार्गातील सर्व ऐतिहासिक ,भौगोलिक ,सांस्कृतीक, वैज्ञानिक महत्त्वाच्या स्थळांची शैक्षणिक प्रश्नावली विद्यार्थ्यांना सहलीच्या अगोदरच उपलब्ध करून देऊन त्याचा अभ्यास घेण्यात आला होता. हे या सहलीचे प्रमुख वैशिष्ट्य. सहलीमध्ये चंद्रभागा नदी, पंढरपूर व विठ्ठल मंदिर ,कृष्णा व पंचगंगा संगम नृसिंहवाडी, पन्हाळा किल्ला, शाहू पॅलेस, महालक्ष्मी मंदिर व त्याची रचना, जुना शाहू राजवाडा, भवानी मंडप, कोल्हापूर शेतकरी सहकारी बाजार ,सांगली जिल्ह्यातील द्राक्षाची बागा, सह्याद्री पर्वताची चढाई करत असताना लागणारे भारतातील सर्वात पहिले राधानगरी व दाजीपूर अभयारण्य, राधानगरी धरण, कणकवली शहर, मालवण शहर, बोटीच्या प्रवासासह सिंधुदुर्ग किल्ला, मालवण जवळील अतिशय सुंदर असे कुंभारमाठ गाव ,कुणकेश्वर मंदिर व बीच, देवगड किल्ला व देवगड दीपस्तंभ, विजयदुर्ग किल्ला ,गणेश गुळे बीच , रत्नागिरी शहर व थिबा पॅलेस, नानीज मठ ,आंबा घाट, आंबा घाटातील जावळी गावातील अतिशय सुंदर व प्रशस्त असे चैतन्य हिल रिसॉर्ट, व तेथील स्विमिंग पूल आणि जेवण ,असा प्रवास संपन्न झाला. मुक्कामाच्या ठिकाणी उजेडात सायंकाळी पाच ते सहा च्या दरम्यान पोहोचून सात ते आठच्या दरम्यान सायंकाळचे जेवण विद्यार्थ्यांना देण्यात आले. कोल्हापूर येथील प्रशस्त असे मंगल कार्यालय व व तेथील सायंकाळचे कोल्हापुरी तेज जेवण, टॉयलेट बाथरूमची जास्त संख्येने उपलब्धता, फॅन ट्यूब ची व्यवस्था ,तसेच मालवण येथील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशस्त असे मंगल कार्यालय, टॉयलेट बाथरूम व सायंकाळच्या जेवणाची मालवणी खाद्यपदार्थासह व्यवस्था, पावस येथे स्वामी स्वरूपानंद मठामध्ये भरपेट महाप्रसाद व मठाच्या भक्त निवास मध्ये मुक्कामाची व्यवस्था ,मुक्कामाच्या ठिकाणी दुसऱ्या दिवशी सकाळी स्नानासाठी गरम पाणी व शक्य तिथे नाष्टा आणि सर्वात महत्त्वाचे



म्हणजे आंबा घाटातील चैतन्य रिसॉर्ट जिथे प्रति मानसी एन्ट्री फीस किमान हजार रुपये असते तिथे शाळेचे माजी विद्यार्थी मॅनेजर असल्याने रिझल्ट सर्व सुविधा केवळ जेवणाच्या शुल्कात समाविष्ट करून तेही ५०% सवलतीने उपलब्ध झाले. सहली दरम्यान अगोदरच पुरवलेल्या प्रश्नावलीचा पुन्हा प्रत्यक्ष अनुभूतीने अभ्यास झाला. भरती ओहोटी, पर्वत ,दऱ्या ,राष्ट्रीय उद्यान ,अभयारण्य, किल्ले ,त्यांची बांधणी ,बुरुज, बालेकिल्ला ,दारूगोळा ,धान्याचे कोठार, तटबंदी ,बेट ,खाडी ,नारळ ,सुपारी, हापूस आंबा व फणसाच्या बागा ,रांगडी कोल्हापुरी भाषा, मालवणी भाषा, कोकणी भाषा, जांभी मृदा व जांभा खडक ,भाताची शेती ,खडकाळ दलदलीचा व पुळण असलेला समुद्रकिनारा, कोकणातील आर्द्र व सौम्य वातावरण, खारे वारे ,मतलई वारे ,वीज निर्मिती प्रक्रिया, खडकांची झीज, कोकणी माणसांचे राहणीमान, माशांचे विविध प्रकार ,ऐतिहासिक शस्त्रे व तोफा व तोफ गोळे ,पठारावरील व कोकणातील नद्यांतील फरक, सावकाशपणे प्रवास करत विद्यार्थ्यांना ही माहिती प्रत्यक्ष अनुभवता आली. शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रताप काळे सर यांच्या मार्गदर्शनामध्ये सहलीचे आयोजन करण्यात आले. सहलीमध्ये विद्यार्थ्यांची काळजी घेणारे आदरणीय श्री तांबोळी सर ,श्रीमती खेडकर मॅडम ,श्री गायकवाड सर, श्री नागरगोजे सर, श्री तांबे सर ,श्रीमती पोकळे मॅडम व श्रीमती दोडके रेणुका मॅडम श्री अशोक कराड सर व चालक श्री अभिमान राख साहेब यांचे खूप खूप अभिनंदन.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .